Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


## Peer-Reviewed & Refreed Indexed


### Multidisciplinary International Research Journal

**April -2021**

**ISSUE No- (CCLXIX ) 285**





**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social**
**Research & Development**
**Training Institute Amravati**

**Editor:**
**Dr.Dinesh W.Nichit**
**Principal**
**Sant Gadge Maharaj**
**Art's Comm,Sci Collage,**
**Walgaon.Dist. Amravati.**

**Executive Editor:**
**Dr.Sanjay J. Kothari**
**Head, Deptt. of Econom**
**G.S.Tompe Arts Comm,Sci (**
**Chandur Bazar Dist. Amr**

**This Journal is indexed in :**

- **Scientific Journal Impact Factor (SJIF)**
- **Cosmos Impact Factor (CIF)**
- **International Impact Factor Services (IIFS)**

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publicatio

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 39 | ओजस्वी काव्य 'कलश' निर्माता :—शाहीर अमर शेख<br>**प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने** | 162 |
| 40 | व्यवसाय व्यवस्थापनाच्या दृष्टीने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या निधी आणि कर्जाचा चिकित्सक अभ्यास. **सहा.प्रा. प्रवीण तु.जाधव** | 166 |
| 41 | डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जाती निर्मुलनासंबंधीचे तत्वज्ञान<br>**प्रा.डॉ. सुभाष दौलतराव उपाते** | 175 |
| 42 | लिंगसंबंधी असमानता आणि भारतीय स्त्रियांचा बदलता दर्जा<br>**संदीप महादेवराव. हाडोळे** | 182 |
| 43 | Pandemic effects on students and online learning<br>**Dr. Suyog Shankarrao Ingle** | 185 |
| 44 | A.K. Ramanujan's Important Poems: A Critical Appreciation<br>**Dr. Kulkarni Sanjay Ganpatrao** | 188 |
| 45 | Rural Women Empowerment And Entrepreneurship Development<br>**Dr. Vaishali Fating** | 191 |
| 46 | राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेतील श्रमनिष्ठा **प्रा.डॉ.ममता दयने** | 193 |
| 47 | मर्ढेकरांच्या काव्यातील यंत्रयुगाचे चित्रण **प्रा.डॉ.सविता मा.पवार** | 196 |
| 48 | A shift in the character portrayal of women in Indian fiction and the emergenceof New Women **Dr.Aachal Mundafale** | 200 |
| 49 | Re-Engineering of Academic Library System : Challenges and Opportunity **Sudhir B. Sangole** | 202 |
| 50 | सोनपेठ तालुक्यातील सामाजिक व धार्मिक जीवन **प्रा.डॉ.अंभुरे एस.डी** | 206 |
| 51 | The economic , social and ecological value of ecosystem services.<br>**Dr.Padaval Mallu** | 208 |
| 52 | Rebellious Women Characters In William Faulkner's Novel<br>**Dr S. L. Khandel** | 213 |
| 53 | विदर्भातील ऐतिहासीक पर्यटनस्थळ चिखलद **प्रा. डॉ. व्हि.जि. वसु** | 218 |
| 54 | Sports Management **Dhananjay P.Girhepunje** | 221 |
| 55 | ग्रंथालय नेटवर्कव्दारे दिल्या जाणाऱ्या सेवा **प्रा. डॉ. सरला निंभोरकर** | 223 |
| 56 | शास्त्रीय संगीत व तंबोरा **प्रा. नाना जाधव** | 227 |
| 57 | डिजिटल मार्केटिंग — काळाची गरज **Dr. Vidya P. Channe** | 232 |




Scanned with OKEN Scanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 285 (CCLXXXV)

ISSN : 2278-9308
April, 2021

# शास्त्रीय संगीत व तंबोरा

**प्रा. नाना जाधव**

डॉ.एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट् ॲण्डकॉमर्स पवनी, जि.भंडारा

**प्रस्तावना** :—प्राचीन भारताच्याइतिहासाचा जेंव्हा आपण अभ्यास करतो. तेंव्हा आपल्या असे निदर्शनास येते कि,ज्या ललित साहित्यातील वेगवेगळया कला आहेत. त्या संपूर्ण कलांमधून जी कला सर्वात श्रेष्ठ व उच्चं मानल्या जाते. ती कला म्हणजे संगीत कला होय, त्यातही शास्त्रीय संगीत कला तर अस्सल भारतीय मातीतून जन्मंलेली प्राचीन कला होय. ज्या कलेचा सुंगध तिच्या जंन्मापासून आजही तेवढाच दरवळतो. म्हणून अशा कलेची महती जेवढी गायली तेवढी कमीच आहे. त्यामुळेच संपूर्ण जगाचे लक्ष आज भारतीय शास्त्रीय संगीताकडे आकर्षीत होते.

. ज्याप्रमाणे शास्त्रीय संगीतअतिशय प्राचीन व नावलौकिक आहे. त्याचप्रमाणे या शास्त्रीय संगीताला गाण्यासाठी ज्या महत्वपूर्ण वाद्यांचीसाथ लागते. ते वाद्य म्हणजे तंबूरा ते तेवढेच नावलौकिक आहे. तंबूरा वाद्या शिवाय शास्त्रीय गायन होउच शकत नाही. ऐवढेच काय शास्त्रीय गायन तंबो—या शिवाय सूने आहे.आणि म्हणूनच उत्तर हिंदूस्थानी व दक्षिण हिंदूस्थानी संगीत पध्दतीमध्ये तंबू—याचा प्रयोग गायन वादन नृत्य या तिनही कलांना स्वर देण्यासाठी केला जातो. श्रृति शुध्दता वा षडज स्वराचे स्थायित्व कायम राहणे हे भारतीय शास्त्रीय संगीतातील महत्वपूर्ण अंग असल्यामुळे तंबूरा हे वादय निरंतर वाजणे हे अनिवार्य आहे. आणि म्हणूनच शास्त्रीय संगीत गायनामध्ये तंबूरा हे अतिशय महत्वपूर्ण वाद्य ठरते. आज शास्त्रीय संगीत आणि तंबूरा याला आपण वेगवेगळे पाहूच शकत नाही. म्हणून शास्त्रीय संगीत व तंबूरा या विषयाची थोडक्यात संशोधनात्मक मांडणी करण्याचा मी एक छोटासा प्रयत्न केला आहे.

**शास्त्रीय संगीत व तंबोरा**:—शास्त्रीय संगीत व तंबोरायाविषयाची मांडणी करत असतांना शास्त्रीयसंगीत म्हणजे काय हे बघणे अत्यंत महत्वाचे ठरते.तसे पहाता शास्त्रीय संगीताच्या व्याख्या अनेक संगीत तज्ञानी आपआपल्यापध्दतीने करण्याचा प्रयत्नकेला आहे.जसे की, जे संगीत स्वर, ताल, लय, राग ईत्यादी नियमांनी बांधून वैज्ञानिक पध्दतीने प्रस्तूत होते, त्याला शास्त्रीय संगीत म्हणतात. म्हणजे याचाच अर्थ असा की शास्त्रीय संगीत हे एका विशिष्ट नियमांत बांघलेलेअसे संगीत आहे. आणि त्याच विशिष्ट नियमानूसार ते गावे लागते. अशा प्रकारच्या नियमाचे पालन करणे हेच एक मोठे शास्त्रीय संगीताचे तत्व मानल्या जाते.शास्त्रीय संगीत हे एक आधुनिक राग प्रधान संगीत आहे.रागांचे आपआपले स्वर व नियम आहेत. तसे पहाता या विषयाचे अनेक ग्रंथ आहेत.तसेच शास्त्रीयसंगीताचेही अनेक ग्रंथ आहेत, जसे की नारद शिक्षा, रागनिरूपण, पंचमसारसंहिता,संगीत मकरंद ईत्यादी. संगीत शास्त्राच्या प्रमुख आचार्यांमध्ये प्रमुखता: उमामहेश्वर, भरत, नन्दी,वासुकी,नारद,व्यास आदीनीगीनती मोठया आदरानेकेल्या जाते. या सर्वानी हेच सांगीतले की गायन वादन व नर्तनया तीनही कलांच्या समुहाला जरी संगीत म्हणतात, पण प्रत्येकाचे एक वेगळेपण आहे. व वेगळा संस्कार आहे.असे जरी असले तरी मुलभूत सिध्दांत मात्र या सर्वांना एकच आहे.जसे की गायनात स्वर आहेत. तालासोबत शब्द व कविता पण असतेच.

शास्त्रीय संगीतात शब्दांपेक्षा स्वर व [illegible] मांडणीकरणावरविशेष जोर दिला जातो.शास्त्रीय संगीत गातांना सूरूवातीला आलाप,बंदिशीमध्ये वेगवेगळी लयकारी, तान अशा प्रकारे गायल्या जाते. म्हणजेच एक गोष्ट आपल्या लक्षात येते की शास्त्रीय संगीत गायनकरण्याचे एक विशिष्ट प्रकारचे मुलभूत शास्त्र आहे. आणि त्या शास्त्रानूसार प्रत्येक शास्त्रीय गायक आपली गायकी करत असतो.

जसे शास्त्रीय संगीत गाण्याचे एक मुलभूत शास्त्र आहे. तसेच शास्त्रीय गायन करण्यासाठी काही मुलभूत व महत्वपूर्ण वाद्यांची मुलभूत गरज असते. काही महत्वपूर्ण वाद्यांच्या साथसंगती शिवाय कोणताच गायकआपले गायन करूच शकत नाही.जसे की हारमोनियम, तबला, सारंगी, सतार, पखावज, व तंबोरा हे वादय शास्त्रीय संगीत गाण्याचे महत्वपूर्ण वादय आहेत. परंतूयाही पेक्षा मला जे वादय माझ्या मनाला भावले, जे वादय ऐकताच मन तरंगायला लागते.व राग गायला लागते. ते वादय म्हणजे तंबोरा होय. कारण ज्या वाद्याच्या साथीमुळे गायकाच्या आवजाची तयारीच नाहीतर गायकांचे उच्चंत्तम स्वरांज्ञानही तेवढेच वाढते.व गायकाला आत्मविश्वास निर्माण करून देते, असे महत्वपूर्ण वादय म्हणजे तंबूरा